आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१५ ऑगस्ट २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित आणि समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी सर्वस्व अर्पण करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं स्वातंत्रदिनी लाल किल्ल्यावरुन आवाहन

- देशाची सुरक्षा यंत्रणा मजबूत करण्यासाठी सुदर्शन चक्र मोहिमेची घोषणा, पेट्रोल-डिझेल आयातीवरील खर्च कमी करण्यासाठीही विशेष मोहीम

- जीएसटीमधले १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा काढून टाकण्याचा अर्थमंत्रालयाचा प्रस्ताव

- किश्तवाड जिल्ह्यात ढगफुटीमुळे झालेल्या मृत्यूंची संख्या ६० वर

**आणि**

- रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची आज अमेरिकेत भेट

**<><><><><>**

भारताला २०४७ पर्यंत विकसित करण्यासाठी आणि समृद्ध भारत निर्माण करण्यासाठी सर्वस्व अर्पण करुन काम करा, नवीन संधी निर्माण करा, आणि देशातल्या १४० कोटी नागरिकांना त्याचा लाभ मिळेल यासाठी प्रयत्न करा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नवी दिल्लीत लाल किल्ल्यावर प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. त्यानंतर त्यांनी देशवासियांना संबोधित केलं. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

होल्ड पॅकेज

देशवासियांना संबोधित करताना सुरुवातीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातल्या महापुरुषांना अभिवादन केलं तसंच ऑपरेशन सिंदूरमधे कर्तृत्व गाजवणाऱ्या सैनिकांचं कौतुक केलं. यापुढं दहशतवाद्यांनी आगळीक केल्यास सडेतोड उत्तर देऊ असा असा इशारा त्यांनी दिला.

**Byte - PM--NO-NUCLEAR-WARNING.mp3**

शत्रुच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी स्वदेशी बनावटीच्या सुदर्शन चक्र मिशनची घोषणा प्रधानमंत्र्यांनी आज केली. देशाची सुरक्षायंत्रणा मजबूत करण्याच्या या मिशन अंतर्गत शत्रूचा हल्ला निकामी करुन त्यांना प्रत्युत्तर देण्याचं लक्ष्य आहे. शेतकरी, मच्छिमारांचं हित जपण्यासाठी सरकार कटीबद्ध आहे आणि त्यात तडजोड होईल, असा कुठलाही करार करणार नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी स्थानिक गोष्टींचा अवलंब करण्याचं आवाहन केलं.

**Byte - PM-LOCAL-FOR-VOCAL.mp3 (00-15-to end)**

नवनवीन औषधं, लढाऊ विमानांचं इंजिन देशात तयार करण्याचं आवाहन त्यांनी युवकांना केलं. दिवाळीपूर्वी जीएसटीमध्ये आमुलाग्र बदल करुन दैनंदिन उपयोगांच्या वस्तूंवरचे कर कमी करण्याची घोषणा प्रधानमंत्र्यांनी आजच्या भाषणात केली. यामुळं छोट्या आणि मध्यम उद्योगांना चालना मिळेल आणि अर्थव्यवस्थेच्या वाढीला मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या काहीवर्षात देशात कायदे, आयकर यासह इतर क्षेत्रात झालेल्या सुधारणांची आठवण प्रधानमंत्र्यांनी यावेळी देशातल्या नागरिकांना करुन दिली आणि भविष्यातल्या सुधारणांचं सुतोवाच केलं.

*Byte- (नेक्स्ट जनरेशन रिफॉर्म्स के लिए हमने एक टास्क फोर्स गठित करने का निर्णय किया है। यह टास्क फोर्स समय सीमा में इस काम को पूरा करें। वर्तमान नियम, कानून, नीतियां, रीतियां 21वीं सदी के अनुकूल, वैश्विक वातावरण में अनुकूल और भारत को 2047 में विकसित राष्ट्र बनाने के संदर्भ में नए सिरे से तैयार हो और उसका समय सीमा में अपना कार्य पूरा करने के लिए टास्क फोर्स की रचना की है।)*

आजपासून लागू होणाऱ्या प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत पहिल्यांदा नोकरीला लागणाऱ्यांना सुमारे साडे ३ कोटी युवकांना १५ हजार रुपये सरकारकडून दिले जातील, असं ते म्हणाले. चालू वर्षअखेरपर्यंत स्वदेशी बनावटीची चिप बाजारात येईल, २०४७ पर्यंत अणूऊर्जा क्षमता १० पटींनं वाढेल असं ते म्हणाले. घुसखोरीच्या समस्येवर मात करण्यासाठी नव्या मिशनची तसंच पेट्रोल - डिझेलच्या आयातीवर होणारा खर्च कमी करण्यासाठी नव्या मोहिमेची सुरुवात करणार असल्याचं ते म्हणाले.

**PM--DEEP-WATER-EXPLORATION-MISSION**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीच्या निमित्तानं विशेष कार्यक्रम सरकार सुरू करणार आहे, अशी घोषणा त्यांनी आज केली. लाल किल्ल्यावर आयोजित या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री, वरिष्ठ अधिकारी, देशभरातून आमंत्रित केलेले मान्यवर आणि मोठ्या संख्येनं नागरिक उपस्थित होते. लाल किल्ल्यावर झालेल्या परेडमध्ये मूळची नागपूरची असलेल्या लेफ्टनंट कमांडर जुई भोपे यांनी पंतप्रधान रक्षक दलाच्या पथक प्रमुख म्हणून नेतृत्वाची धुरा सांभाळली होती. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्तानं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नवी दिल्लीत राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन पुष्पांजली अर्पण केली.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा करांतर्गत येणाऱ्या सर्व वस्तूंवर ५ टक्के आणि १८ टक्के अशा दोन स्तरात दर निश्चित करावेत, असा प्रस्ताव अर्थमंत्रालयानं वस्तू आणि सेवा कर परिषदेला पाठवला आहे. त्यामुळं १२ आणि २८ टक्के दरांचे टप्पे रद्द होणार आहेत. शेतीसाठी लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तू, आरोग्याशी संबंधित वस्तू, हस्तकलेच्या वस्तू आणि विमा यांच्यावर ५ टक्के आणि इतर वस्तूंवर १८ टक्के जीएसटी लागेल. सिगारेट, तंबाखू, पानमसाला आणि शीतपेयावर आता इतकाच जीएसटी द्यावा लागेल.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात काल झालेल्या ढगफुटीमुळे ६० जणांचा मृत्यू झाला असून १०० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी दिली आहे. आतापर्यंत १६० हून अधिकांची सुटका करण्यात आली आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, पोलीस, लष्कर आणि स्थानिकांच्या मदतीनं मदत आणि

बचाव कार्य सुरू आहे. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्याशी संवाद साधला आणि परिस्थितीची माहिती घेतली.

**<><><><><>**

छत्तीसगढमधे नागपूर - रायपूर राष्ट्रीय महामार्गावर चिरचारी इथं रस्ता अपघातात आज ६ जणांचा मृत्यू झाला. गंभीररीत्या जखमी झालेल्या एकाला रुग्णालयात दाखल केलं आहे. कारवर ट्रक आदळल्यानं हा अपघात झाला.

**<><><><><>**

दिल्लीतल्या निजामुद्दीन भागात असलेल्या हुमायूं मकबऱ्यामध्ये भिंत कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला. दुपारी ही दुर्घटना झाली. आतापर्यंत सुमारे १२ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं असून ढिगाऱ्याखाली काही लोक अडकल्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

पिंपरी-चिंचवडमधे आज विषारी वायुमुळे तीन जणांचा मृत्यू झाला. दुपारी भेळ चौकाजवळ दूरसंचार कंपनीच्या केबलची दुरुस्ती करण्यासाठी तीन कर्मचारी झाकण उघडून खड्ड्यात उतरले होते. त्यावेळी ही दुर्घटना झाली.

**<><><><><>**

नागालँडचे राज्यपाल ला गणेसन यांचं आज संध्याकाळी चेन्नईत निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. त्यांच्यावर चेन्नईतल्या रुग्णालयात उपचार सुरू होते. नागालँडपूर्वी ते मणिपूरचे राज्यपाल म्हणून कार्यरत होते. चेन्नईत उद्या संध्याकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहे.

**<><><><><>**

कर्नाटकात बंगळुरु इथं विल्सन गार्डन परिसरात आज सकाळी झालेल्या स्फोटात एका मुलाचा मृत्यू झाला तर किमान आठ जण जखमी झाले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या

यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. स्फोटात  मृत्यूमु◌ुखी पडलेल्या मुलाच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांची मदत तसंच जखमींना मोफत उपचार देणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं.

**<><><><>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची आज अमेरिकेत अलास्कामधल्या अन्कोरेज इथे भेट होत आहे. या भेटीदरम्यान चर्चेच्या मुद्द्यांबाबत कोणतीही ठोस कल्पना नसली तरी रशिया आपले मुद्दे मांडेल असं रशियाचं परराष्ट्र मंत्री सर्जी सेर्गेई यांनी स्पष्ट केलं. ते एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना बोलत होते. युक्रेनबरोबरच्या युद्धाला पूर्णविराम देण्यासाठी पुतिन तयार असल्याची खात्री ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे.  शांतता निर्माण करण्यासाठी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्यासह चर्चेची दुसरी फेरी होण्याची गरज मात्र ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><>**

प्लास्टिक प्रदूषण दूर करण्यासाठी एक जागतिक करार करण्याचा प्रयत्न पुन्हा एकदा अपयशी ठरला आहे. २०२२ पासून याबाबत चर्चा सुरू आहे. त्यात सुमारे १०० देश मर्यादित प्लास्टिक उत्पादनाच्या बाजूचे आहेत, तर तेल उत्पादक देश, मर्यादित उत्पादनाऐवजी रिसायकलिंगवर भर ठेवण्यासाठी आग्रही आहेत. कराराबाबत सहमती व्हावी, यासाठी संयुक्त राष्ट्रांनी काल मुदत उलटून गेल्यावर मध्यरात्रीनंतरही चर्चा सुरु ठेवली, मात्र हा तिढा कायम राहिला.

**//<><><><><>//**